# फाळणीच्या बळींच्या मुलाखतींचा संग्रह

– मानसी मोकाशी

*विशिष्ट प्रकारच्या वस्तूंचा संग्रह आपल्याकडे आहेत. पण फाळणीसारख्या विस्तृत घटनेच्या बळींच्या अनुभवांवर आधारित मुलाखत संग्रह ही कल्पनाच विस्मयचकित करणारी आहे. त्या अनुभवांतून पुढील अनेक पिढ्यांना त्या घटनेच्या भीषणतेची कल्पना यावी. त्यामुळेच पाचही खंडांत विखुरलेल्या फाळणीच्या दुःखितांच्या अनुभवाचा खजिनाच करण्यात आलेला आहे. आशियात तरी असा दुसरा कुठलाही प्रकल्प नाही, हे या प्रकल्पाचे वैशिष्ट्य आहे.*

१५ ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन जवळ येऊ लागला की उत्सवी वातावरणाला उधाण येते. ते साहजिकही आहे, कारण स्वातंत्र्यदिन हे देशाच्या इतिहासातील महत्त्वाचे वळण असते. स्वातंत्र्याला सात दशके होऊन गेलेली असताना त्या स्वातंत्र्यदिनाचा अनुभव घेतलेली पिढी बरीचशी काळाच्या पडद्याआड गेलेली आहे. ज्यांनी तो काळ अनुभवला ते वयोवृद्ध थोडे लोक त्या दिवसांची आठवण काढू शकतात. स्वातंत्र्यापूर्वी जन्मलेल्या पण त्या काळी अगदी लहान असलेल्या लोकांनी त्या दिवसांच्या आठवणी ताज्या म्हणून त्यांच्या आधीच्या पिढीकडून ऐकलेल्या असू शकतात. 'गदर'सारख्या चित्रपटातून तो काळ आपण पाहिला आणि त्याने अस्वस्थ झालो कारण स्वातंत्र्याबरोबरच आपल्या देशाने फाळणीही अनुभवली. त्याचे चटके बंगाल आणि पंजाबने तीव्रतेने अनुभवले. त्यामुळे असेल, पंजाबच्या एका कन्येने त्या फाळणीसंदर्भात दृक् श्राव्य माध्यमाचा उपयोग करून एक आगळा प्रकल्प हाती घेतला आणि अथक परिश्रमानं तो साकारही होत आहे.

आपण अनेक प्रकारची वस्तुसंग्रहालये पाहिली आहेत. ती इतिहासाचा धांडोळा घेतात, काही प्रमाणात त्यांच्या विषयासंबंधात इतिहास जागाही ठेवतात. पण ते बऱ्याचदा एखाद्या व्यक्तीचे किंवा गटाच्या श्रमाचे फलित असते. ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार असलेल्या जालियनवाला बागेसारख्या वास्तूंना आपण भेट दिल्यावरही आपण वाचलेला किंवा ऐकलेला तो काळ आपल्यासमोर येतो. पण आपण वाचलेले बहुतेकवेळा एखाद्या व्यक्तीने लिहिलेले असते. त्यातही इंग्रजांनी लिहिलेल्या आणि भारतीयांनी लिहिलेल्या कहाण्यांमध्ये दृष्टिकोनाचा फरक असू

शकतो. यापेक्षा १९४७ साली झालेल्या फाळणीसंदर्भात गुनीतासिंग भल्ला यांनी चोखाळलेला मार्ग थोडा वेगळा आहे.

त्या काळाचा मागोवा घेण्यासाठी टीव्ही मालिका, पुस्तके, चित्रपट अशी माध्यमे उपलब्ध आहेत, त्यांच्या जोडीला या फाळणीच्या साक्षीदारांच्या भेटी घेऊन त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती कॅमकॉर्डवर मुद्रित करून त्यांनी त्यांचा संग्रह करण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत त्यांच्या या अथक परिश्रमांत अनेकांनी अनेक मार्गांनी भागीदारी केली आहे. फाळणीमुळे स्थलांतर मोठ्या प्रमाणात झालं. तपस, बुनियाद यासारख्या मालिका, भाग मिल्खा भाग, ऋत्विक घटक यांच्या मेघे ढाका तारा सारख्या चित्रपटांतून आपण तो काळ पाहिला आहे. पण त्या झाल्या छोट्या वा मोठ्या पडद्यावरच्या कथा. सत्यांश असला तरी कथानकाच्या  सोयीसाठी त्यांत काही बदलही केलेले असू शकतात. सत्याचा अपलाप होऊ नये, सत्य आणि सत्यच लोकांच्या तोंडून यावं आणि त्या सत्यकथांचा संग्रह पाहून तो काळ आपल्या समोर उभा करावा असा भल्ला यांचा प्रयत्न आहे. प्रथम वैयक्तिक पातळीवर सुरू झालेला हा प्रकल्प विस्तारत गेला आणि आता त्यानं छोट्या चळवळीचं रूप घेतलं आहे. ६ हजार कुटुंबांनी त्यांच्या वैयक्तिक आठवणी सांगितल्या आहेत. १२ देशांतील ४०० शहरांतून राहणाऱ्या १९४७ साली फाळणीचं दुःख अनुभवणाऱ्या लोकांचा सहभाग यांत आहे.

हे शिवधनुष्य पेलणं एकट्या दुकट्याचं काम नव्हे. या कामाचं महत्त्व पटल्यावर काही स्वयंसेवकांनी स्वयंस्फूर्तीनं या प्रकल्पासाठी आपला वेळ दिला. त्यासाठी जर पैसे दिले असते, तर २०० दशलक्ष रुपये द्यावे लागले असते असं भल्ला यांना वाटतं. मुलाखतींचा हा प्रकल्प उभा करण्यासाठी पैसाही खूप आवश्यक होता. त्यासाठीही १ हजारांहून दाते पुढे आले. स्टॅनफोर्ड विद्यापीठाची लायब्ररी, भारतातील विद्यापीठं अशा अनेक संस्थांनी त्यामध्ये मोलाची कामगिरी केली आहे. www.1947partitionarchive.org या संकेतस्थळावर ही माहिती आहे.

गुनीता सिंग भल्ला यांना असा प्रकल्प हाती घ्यावा असं का वाटलं?

त्याचं असं झालं, सुमारे दोन दशकांपूर्वी न्यूयॉर्कमध्ये वडिलांची वाट पाहात असताना गुनीता यांना एक जुन्या वस्तू विक्री करणारं एक दुकान दिसलं. आडोसा म्हणून त्या त्या दुकानात गेल्या. एका जुन्या कागदाला सरळ करून केलेली फ्रेम त्यांनी पाहिली. काय होतं त्या फ्रेममध्ये? काडीसारख्या दिसणाऱ्या माणसांनी एकत्र येऊन एक मोठं थोरलं इंद्रधनुष्य साकार केलं होतं. त्यांनी ते चित्र घेतलं नाही. पण त्या चित्रानं त्यांच्या मनात घर मात्र केलं. काही दिवसांनी ते चित्र घेण्यासाठी त्या दुकानात गेल्यावर त्यांच्या लक्षात आलं,२० डॉलर किमतीचं ते चित्र विकलं गेलं होतं. भविष्यात त्यांनी हाती घेतलेल्या त्या मोठ्या प्रकल्पाची ठिणगी त्यांच्या मनात त्या चित्रानं टाकली होती.

पुढे २००० साली पदार्थविज्ञानशास्त्रातील डॉक्टरेटचा अभ्यास करण्यासाठी त्या टोकियो येथील हिरोशिमा पीस मेमोरियलला भेट देण्यास गेल्या. हिरोशिमावर बाँब पडल्यावर त्यामध्ये होरपळलेल्या लोकांच्या चक्षुर्वैसत्यं कहाण्यांचा संग्रह त्यांना तिथे पाहण्यास मिळाला. हिरोशिमाच्या बाँबस्फोटावरचे चित्रपट त्यांनी त्यापूर्वी पाहिले असले तरी या व्यक्तिगत कहाण्यांनी त्यांचं हृदय हेलावलं. त्या बाँबनं फक्त हिरोशिमाला नष्ट केलं नाही,तर हजारोंना यमसदनाला पाठवलं. जे जगले त्यांच्याही जीवनात यमयातना आल्या. ते मनानं खचले, शरीरानं पिडले. त्यांच्या नोकऱ्या गेल्या. शरीरं पोखरल्यानं त्यांना विवाहही करता आले नाहीत, कारण त्यांच्याशी विवाह करणं त्यांच्या भावी जोडीदारांना धोक्याचं वाटलं. सामाजिक, आर्थिक, राजकीय, मानसिक अशा अनंत प्रश्नमालिका त्या एका बाँबिंगनं निर्माण झाल्या. तेव्हा एकदम भल्ला यांना 'ते' चित्र आठवलं. आपणही असा काही प्रकल्प भारतीय फाळणीवर केला तर?

त्यातून त्यांनी फरीदकोटमध्ये त्यांच्या आजीआजोबांकडे जाताना सोनी हॉबी कॅमकॉर्डवर अशा काही माहितीच्या, त्यांच्या नात्यातील लोकांच्या फाळणीच्या अनुभवांचं चित्रण करायचं ठरवलं. जून २०१०मध्ये पोस्टडॉक्टोरल रिसर्च करण्यासाठी त्या कॅलिफोर्नियाला गेल्या असताना हरवतार सोधी हे त्यांचे नव्वदीतले मामा निवर्तले, तेव्हा त्यांना जाणवलं, आपल्या प्रकल्पात मोलाची भर टाकू शकणारी व्यक्ती त्यांच्या मुलाखतीशिवायच गेली. जवळचे नातेवाईक गेल्याचे दुःख होतेच, त्यात त्यांची मुलाखत राहून गेल्याची भर पडली. आपलं एकटीचं हे काम नाही याची जाणीव त्यांना त्यावेळी प्रकर्षानं झाली. त्यानंतर पदार्थविज्ञानातील त्यांचं करियर,

वैयक्तिक सुखदुःख सगळं सगळं सोडून त्यांनी या प्रकल्पाला वाहूनच घेतलं. मग जगभरातील स्वयंसेवकांना आवाहन करून त्यांच्या त्यांच्या परिसरातील लोकांच्या फाळणीसंदर्भातील मुलाखतींचा संग्रह त्या करू लागल्या. समाजमाध्यमांवर याची माहिती देऊन त्यांनी लोकांना त्यात सहभागी होण्याचं आवाहन केलं. सर्व धर्म, पंथांच्या लोकांना त्याची झळ पोहोचली असल्यानं आणि त्या फाळणीनंतर संबंधित लोक जगभर विखुरले असल्यानं अशा जागतिक पातळीवरील साहाय्याची आवश्यकता होती.

भल्ला यांना कल्पनाही नव्हती, अशा ठिकाणांहून त्यांच्याशी या प्रकल्पासाठी संपर्क होऊ लागला. पूर्व बंगाल- पश्चिम बंगाल, पूर्व पंजाब- प. पंजाब दोन्हींकडून लोकांची ये जा झालेली होती. त्यामुळे या फाळणीचे चटके दोन्हींकडील लोकांना बसले होते. त्यांच्या दुःखाला वाचा फोडण्याची संधी मिळताच ते मोकळेपणाने बोलू लागले. काहींनी आपली ओळख स्पष्ट होऊ नये अशी इच्छा व्यक्त केली, त्यांच्या मुलाखती खरे नाव न देता घेण्यात आल्या. त्याशिवायही अगदी अनपेक्षित ठिकाणांहून मुलाखती मिळाल्या. इस्रायलचे किबुट्ज. काही यहुदी युवक कराचीहून पुण्याला आले. पाठोपाठ त्यांना इस्रायलच्या बांधणीसाठी १९४८  साली निमंत्रण मिळाले. त्यामुळे त्यांना भारत- पाकिस्तानाबरोबरच इस्रायल-पॅलेस्टीन फाळणीचाही अनुभव आला. जगातील पाचही खंडात विखुरलेल्या या फाळणीमुळे दुःखित झालेल्या लोकांनी यात सहभाग नोंदविला आहे. एकेका मुलाखतीसाठी १५ तासापर्यंत वेळ गेलेला आहे, त्यांचं संपादनही करण्यात आलेलं आहे. या साऱ्याला ३० तासाहून अधिक वेळ गेल्यावर हा केवढा प्रचंड प्रकल्प आहे, याची कल्पना यावी.

प्रत्येक मुलाखत सविस्तर घेण्यात आली. त्यासाठी अनेक तासांची मेहनत लागली. मानवी श्रमांबरोबरच पैशाचीही तितकीच गरज लागली. काही दानशूरांनी अशा मुलाखती घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिल्या. टाटा ट्रस्ट, अशोका युनिव्हर्सिटी स्थापन करणारे आशिष धवन व संजीव बिकचंदानी, अमेरिकन इंडियन फाउंडेशनची स्थापना करणाऱ्या लता कृष्ण, मेक माय ट्रिपचे दीप कालरा, फायबर ऑप्टिकचे जनक नरिंदर कंपनी आणि इतरही अनेकांनी या प्रकल्पासाठी योगदान दिले.

आपल्याकडे इतिहासाची नोंद फार कमी ठेवली जाते अशी परिस्थिती असताना अशा हजारे मुलाखतींतून प्रतीत होणारे अनुभव हा पुढील पिढीसाठी मोठाच ऐतिहासिक दस्तऐवज आहे. हिरोशिमावर पडलेल्या बाँबने जशी अनेक जीवने उद्ध्वस्तत केली, तशीच या भारत पाकिस्तान फाळणीनेही केली. कित्येकांचे संसार उद्ध्वस्त झाले. कित्येक बालपणे अकाली कोळपली. कित्येकांचे होत्याचे नव्हते झाले. तरी काही काळात ही माणसे उभी राहिली. ही त्यातील जमेची बाजू. फाळणीच्या दु:खाने त्यांना धैर्याचेही डोस पाजले. त्यांच्यातील इच्छा पालवल्या. विजिगीषू वृत्तीला खतपाणी घातले. या आणि अशा अनेक वृत्ती, प्रवृत्तींचं दर्शन या मुलाखतींतून होते. पुन्हा कधी कुणावरही अशा प्रसंग येऊ नये यासाठीही हे अनुभव प्रेरणादायी ठरू शकतात.

-------------------------------------------------------------------